# कफ परेड स्थानक होणार सर्वात आधी

## मेट्रो-३ चे काम युद्धपातळीवर; आरे स्थानकाचे काम सर्वात शेवटी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा - वांद्रे -सिप्झ मेट्रो ३ मार्गातील कफ परेड या स्थानकाचे काम सर्वात आधी पूर्ण होणार आहे. या स्थानकाच्या बांधणीचे काम ९५.८ टक्के पूर्ण झाले आहे. तरआतील अन्य कामे ६७.५ टक्के पूर्ण झाली आहेत. आरे या स्थानकाचे काम सर्वात शेवटी पूर्ण होईल.



**● बीकेसी ते कफ परेड या दुसऱ्या टप्प्यातील स्थानकांची कामे ६० ते ९० टक्क्यांच्या आसपास झाली आहेत. या टप्प्यात ग्रंत रोड, गिरगाव, काळबादेवी, सीएसएमटी, हुतात्मा चौक, चर्चगेट विद्याभवन, आणि कफ परेड ही स्थानके आहेत.**

मुंबई मेट्रो रेल कोर्पोरेशनला या मार्गातील आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा याच वर्षी सुरु करायचा आहे. या मार्गाची आरे ते बीकेसी आणि बीकेसी ते सिप्झ अशा दोन भागात विभागणी करण्यात आली आहे. दुसरा टप्पा यावर्षी सुरु होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यावर भर देण्यात आला आहे. मात्र दोन्ही टप्प्यातील कामे तेवढ्याच वेगाने सुरु आहेत. पहिल्या टप्प्यात आरे, सिप्झ, एमआयडीसी, मरोळ नाका, शहर रोड, सीएसएमटी, शहर रोड, सांताक्रूझ, विद्यानगरी आणि बीकेसी ही स्थानके आहेत. सिप्झ स्थानकाने मोठी मजल मारली आहे. या स्थानकाचे काम ९७.२ टक्के झाले आहे. तर स्थानकातील सरकते जिने, विद्युत पुरवठा व अन्य सुविधा उभारण्याची कामे ८५. ७ टक्के पूर्ण झाली आहेत. कारडेपोच्या वादामुळे आरेतील बांधकामावर परिणाम झाला होता. २०१९ पासून काम जवळपास थांबले होते. आता वादावर पडदा पडल्यामुळे कामे वेगात सुरु करण्यात आली आहेत. आरे स्थानकाचे काम २७. ३ टक्के पूर्ण झाले आहे.